**सन २०१७-१८ करीता आदिम जमातीचा विकास या राज्य योजनेंतर्गत आदिम जमातीच्या कुटुंबाकरिता घरकुल निधी राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कडे वर्ग करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आदिम-२०१७/प्र.क्र.८०/का.-१९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २८/०३/२०१८

**वाचा -**

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: आदिम-२०१७/प्र.क्र.१३/का-१९, दि. ०६/०२/२०१७
२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: शघयो-२०१६/प्र.क्र.३३६/का-१७, दि. ०६/०१/२०१७
३. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: बीयुडी-२०१७/प्र.क्र.०१/का-६, दि. ०५/०४/२०१७
४. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: आदिम-२०१७/प्र.क्र.८०/का-१९, दि. २०/१२/२०१७
५. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांचे पत्र क्र.आदिम-२०१७-१८/राज्यस्तर /प्र.क्र.४२ (१७) / का. ५(३ ) , दि.२६.०३.२०१८

**प्रस्तावना -**

राज्यातील कातकरी, माडिया गोंड व कोलाम या जमाती आदिम जमाती (Particularly Vulnerable Tribes) म्हणून केंद्रशासनाने अधिसूचित केलेल्या आहेत. या जमातींना प्रामुख्याने निवासाचा प्रश्न मोठयाप्रमाणात भेडसावत असल्यामुळे ते स्थलांतर करत असल्याची बाब निदर्शनास आल्याने निवासाचा प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देउन सन २०१७-१८ मध्ये आदिम जमातीचा विकास या योजनेसाठी रू.१६००.०० लक्ष निधी शासन निर्णय दि.०५.०४.२०१७ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास नाशिक याना वितरित करण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ करीता आदिम जमाती करीता सपाट प्रदेशाकरीता रु. १.३२ लक्ष व डोंगराळ व नक्षलग्रस्त भागामध्ये रु. १.४२ लक्ष याप्रमाणे घरकुलांचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. यानुषंगाने आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.२०.१२.२०१७ अन्वये १०२१ घरकुल लक्षांकांसाठी रु.१४००.०० लक्ष निधी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांनी दि.२६.०३.२०१८ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात आदिम जमातीचे घरकुल (राज्यस्तर योजना) अंतर्गत शिल्लक असलेल्या रु.२००.०० लक्ष निधीमधून १५१ लक्षांकासाठी रू.१९९.३२ लक्ष राज्य व्यवस्थापन कक्षाकडे वर्ग करण्याची विनंती केलेली आहे.त्यानुसार सन २०१७-१८ करीता उपलब्ध निधीतून घरकुल बांधण्याकरीता १५१ लक्षांकासाठी रू.१९९.३२ लक्ष निधी राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय (Government resolution)-**

आदिम जमातीचे घरकुल (राज्यस्तर योजना) अंतर्गत प्रति घरकुल रू.१.३२ लक्ष प्रमाणे सिंधुदुर्ग व यवतमाळ जिल्ह्यातील १५१ घरकुलांसाठी रू.१९९.३२ लक्ष इतका निधी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह

निर्माण यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे . यासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी ही त्या त्या जिल्ह्याचे संबधित प्रकल्प अधिकारी , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. या योजनेखाली जिल्हानिहाय /अनुसूचीत जमाती निहाय घरकुलांचे उद्दीष्ट व प्रस्तावित निधी वितरणाचा लक्षांक खालील तालिकेत नमूद केल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | जिल्हा | घरकुलाचा लक्षांक | प्रति घरकूल निधी (रु.लक्ष) | घरकुलाकरीता प्राप्त होणारा निधी (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५३ | १.३२ | ६९.९६ |
| २ | यवतमाळ | ९८ | १.३२ | १२९.३६ |
| | **एकुण** | १५१ | | १९९.३२ |

(टिप:- उपरोक्त प्रमाणे लक्षांकांमध्ये स्थानिक स्तरावर सपाट व डोंगरी भागाचे निकष लक्षात घेवून प्राप्त निधीच्या मर्यादेत लक्षांकामध्ये बदल करण्याचे अधिकार संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना राहील)

२. या योजनेखाली वितरीत करण्यात येणारा रु. १९९.३२ लक्ष इतका निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे मार्फत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कडे तात्काळ वर्ग करण्यात यावा.

३. सदर योजनेचा खर्च मागणी क्र. टी-५, मुख्य लेखाशीर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - ०१ - अनुसूचित जमातीचे कल्याण - ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (४९) आदिम जमातीचे विकासासाठी केंद्रीय क्षेत्र योजना, ३१ सहायक अनुदाने (२२२५ c ८८५) (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित झालेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

४. उपरोक्त मंजूर करण्यात आलेले अनुदान ते ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११०५४३२०७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.03.31 10:55:29 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३. प्रधान सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.

४. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई.

५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

६. राज्य संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामिण गृह निर्माण, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

९. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. सह सचिव /उप सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.

११. अवर सचिव , का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. संगणक समन्वयक, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.